शासन शुध्दिपत्रक, क्रमांक ग्रापापु-१००४ /प्र.क्र.२४४/पापु-०७, दिनांक ८ फेब्रुवारी,२००५ चे सहपत्र

## सुधारित परीशिष्ट - अ

| अ.क्र. | निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दत | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| १. | (अ)लाभधारकांना होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सध्याचे प्रमाण. | २५ गुण | (अ) लाभधारकांना होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सध्याचे प्रमाण<br>१. गावात शासकीय पाणी पुरवठा योजना नाही अथवा पूर्णपणे बंद असून सुरु करता येण्यापलीकडे आहे.<br>२. गावात शासकीय पाणी पुरवठा योजना आहे.त्यातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे प्रमाण:<br>अ) ०- १० लिटर<br>ब) ११ - २० लिटर<br>क) २१- ३० लिटर<br>ड) ३१लिटर अथवा त्यापेक्षा जास्त परंतु ४० लिटरपेक्षा कमी<br>इ) ४० लिटर व त्याचे वर | २५ गुण<br><br><br><br>२० गुण<br>१५ गुण<br>१० गुण<br>५ गुण<br>० गुण |
| | (ब) पाणी टंचाई असल्याने टँकर लावावी लागणारी गांवे | १० गुण | (ब) पाणी टंचाई असल्याने टँकर लावावी लागणारी गावे<br>१) सतत ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास<br>२) सतत २ वर्षा पेक्षा जास्त पण ५ वर्षापर्यंत टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास<br>३) सतत २ वर्षे टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास | १० गुण<br>५ गुण<br>३ गुण |
| २. | पाणी प्रत<br>अ) नैसर्गिक | २५ गुण | (अ) नैसर्गिक<br>१) फ्लोराईड /आर्सेनिक यांनी बाधित स्त्रोत<br>२) नायट्रेट किंवा मचुळपणाने बाधित स्त्रोत<br>३) शिशामुळे बाधित स्त्रोत<br>४) इतर हानिकारक खनिज किंवा आरोग्यास धोकादायक बाबी. | <br>२५ गुण<br>२० गुण<br>१५ गुण<br>१० गुण |
| | ब) मानवनिर्मित, औद्योगिक किंवा शहरी सांडपाण्यामुळे पाण्याची प्रत बिघडणे (यामध्ये गावाचा प्रत्यक्ष दोष नाही अशा कारणांचा अंतर्भाव होईल.) | | (ब) मानवनिर्मित<br>गावालगतच्या स्त्रोतात प्रयोगशाळेच्या पृथक्करणानुसार प्रदूषण विहित प्रमाणापेक्षा अधिक असल्यास व स्त्रोत पिण्यासाठी वापरणे शक्य नसल्यास व त्यामूळे दुरुन पाणी आणावे लागत असल्यास | ५ गुण |

